मुंबई पोलीस दलाकरिता ३० अश्वांसह माऊंटेड पोलीस या युनिटची निर्मिती करण्यास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः अेपीओ-३११८/प्र.क्र.१३२/पोल-३

गृह विभाग, २ रा मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २८ फेब्रुवारी, २०१९

वाचा :-

१. पोलीस आयुक्त, मुंबई यांचा जा.क्र.६८०/पोआ/कावसु/परि-७/२०१८ दि.०६.११.२०१८ रोजीचा प्रस्ताव.
२. शासनाचे सम क्रमांकाचे दि.१५.०२.२०१९ रोजीचे पत्र.
३. पोलीस आयुक्त, मुंबई यांचे जा.क्र./पोआ/कक्ष-२(४)/२१३/१९, दि.१६.०२.२०१९ रोजीचे पत्र.

प्रस्तावना

कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती हाताळण्यासाठी पोलीस आयुक्त, मुंबई यांनी ३० अश्वांसह मांउटेड कॉप्स या नवीन घटकाच्या निर्मितीबाबत सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपलब्ध मनुष्यबळातून “मांउटेड कॉप्स” हा नवीन घटक निर्माण करणे व त्यानुषंगाने येणाऱ्या आवर्ती व अनावर्ती खर्चास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय:-

मुंबई पोलीस दलाकरिता ३० अश्वांसह “माऊंटेड पोलीस” या नवीन घटकाच्या निर्मितीस मान्यता देण्यात येत आहे. तसेच यासाठी येणाऱ्या आवर्ती खर्च रु.८२,४६,७२४/- तसेच अनावर्ती खर्च रु.१,१६,८३,८६४/- खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

२. माऊटेंड पोलीस घटकासाठी आवश्यक १ पोलीस उपनिरीक्षक, १ सहायक पोलीस उपनिरीक्षक, ४ पोलीस हवालदार व ३२ पोलीस शिपाई असे एकुण ३८ अधिकारी/कर्मचारी हे स.पो. नायगाव विभागातील, मुंबई यांचे आस्थापनेवरील मंजुर मनुष्यबळातुन “माऊटेंड पोलीस” घटकासाठी वर्ग करण्यात येत आहे.

३. “माऊटेंड पोलीस” घटक पोलीस उपायुक्त, जलद प्रतिसाद पथक (QRT), मुंबई यांच्या अधिपत्याखाली कार्यरत असेल.

४. प्रस्तुत प्रकल्पासाठी होणारा खर्च हा “मागणी क्र.बी-१, २०५५ पोलीस,१०१ गुन्हे अन्वेषण व दक्षता (००)(०१) गुन्हे अन्वेषण विभाग,बृहन्मुंबई (२०५५००३२)(अनिवार्य)-५०,इतर खर्च या लेखा शीर्षाखालील त्या त्या वर्षीच्या मंजुर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. हा शासन निर्णय दि.२७.०२.२०१९ रोजीच्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीतील मान्यतेनुसार व वित्त विभाग अनौपचारीक संदर्भ क्र.३५९/२०१८/व्यय-७, दि.२०.१२.२०१८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०२२८१६१३२७४५२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Dinesh Appaji Saste

Digitally signed by Dinesh Appaji Saste
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a49495d0d4b31e36ff1d612a85453ca984b74e28fd6f99cdf66e3e499969e942, cn=Dinesh Appaji Saste
Date: 2019.02.28 16:16:06 +05'30'

(दिनेश सस्ते)
कार्यासन अधिकारी, गृह विभाग

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
२. मा.राज्यमंत्री, गृह (शहरे) यांचे खाजगी सचिव.
३. मा.राज्यमंत्री, गृह (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव.
४. मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य , मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (गृह),गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव (विशेष),गृह विभाग,मंत्रालय, मुंबई.
८. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. पोलीस आयुक्त, मुंबई.
१०.महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
११.महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
१२.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१३.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१४. निवडनस्ती, पोल-३.

*****